# N 814

Seat No. [ ]

2023 III 03 1100 -N 814- MARATHI (16) (SECOND OR THIRD LANGUAGE) (M)

(REVISED COURSE)

Time : 3 Hours (Pages 15) Max. Marks : 80

**कृतिपत्रिकेसाठी सूचना :—**

(1) सूचनेनुसार आकलनकृती व व्याकरण यांमधील आकृत्या काढाव्यात.

(2) आकृत्या पेननेच काढाव्यात.

(3) उपयोजित लेखनातील कृतींसाठी (सूचना, निवेदन) आकृतीची आवश्यकता नाही. तसेच या कृती लिहून घेऊ नयेत.

(4) विभाग 5—उपयोजित लेखन **प्र. 5 (अ) (2)** सारांशलेखन या घटकासाठी गद्य विभागातील **प्र. 1 (इ)** अपठित उतारा वाचून त्या उताऱ्याचा सारांश लिहावयाचा आहे.

(5) स्वच्छता, नीटनेटकेपणा व लेखननियमांनुसार लेखन यांकडे जाणीवपूर्वक लक्ष दयावे.

## विभाग 1 : गद्य

1. (अ) **उताऱ्याच्या आधारे सूचनेनुसार कृती करा :**

(1) खालील विधाने चूक का बरोबर ते लिहा : 2

(*i*) पहाटे चार वाजता शेवटची गाडी इथून जाते.

(*ii*) निरंजनने धावतच स्टेशनमास्तरांना गाठले.

(*iii*) स्टेशन इथून खूप दूर होतं.

(*iv*) पुलावरचे रूळ चांगल्या स्थितीत होते.


P.T.O.

https://www.maharashtrastudy.com

रात्री दोन वाजता शेवटची गाडी इथून जाते. त्यानंतर पहाटेस कुणीतरी हा उपद्व्याप जाणीवपूर्वक केला असावा. आता प्रवाशांनी भरलेली नऊ पन्नासची गाडी येईल. निरंजन एकदम सावध झाला. गाडी आली तर भयंकर अपघात होईल, हे त्याच्या लक्षात आलं. निरंजन नागरिकशास्त्राचा पेपर, देशमुखांकडचं जेवण सारं विसरला. त्याच्या डोळ्यांसमोर धाड्धाड् आवाज करत येणारी रेल्वेगाडी दिसू लागली. कानठळ्या बसवणारा आवाज आणि लोकांच्या किंकाळ्या कानांत घुमू लागल्या. स्टेशन इथून खूप दूर होतं. तीन-चार किलोमीटर तिथपर्यंत सांगायला जायचं तर परीक्षा बुडणार होती. मग नापास. भडसावळे गुरुजींची मदत बंद. शिक्षणही बंद. रेल्वेने फिरायचं स्वप्न अपुरंच राहणार होतं; परंतु मन मनायला तयार नव्हतं. त्याने क्षणभर विचार केला आणि स्टेशनच्या दिशेने धाव घेतली. तो स्टेशनात शिरला तेव्हा नऊ पन्नासची गाडी नुकतीच आली होती. आता पाच मिनिटांतच ती सुटणार होती.

निरंजनने धावतच स्टेशनमास्तरांना गाठलं. त्यांना पुलावरच्या खराब झालेल्या रुळांबद्दल सांगितलं; पण ते त्यांना खरंच वाटेना. अखेर निरंजनने आर्जवं केली, की निदान पाहून आल्याशिवाय तरी गाडी सोडू नका. मी खोटं बोलत असेन, तर मला पोलिसांच्या ताब्यात द्या.

(2) आकृती पूर्ण करा : 2




https://www.maharashtrastudy.com

(3) **स्वमत :** 3

तुम्हाला अभिप्रेत असलेली आदर्श विद्यार्थ्याची गुणवैशिष्ट्ये लिहा.

**(आ) उताऱ्याच्या आधारे सूचनेनुसार कृती करा :**

(1) चौकटी पूर्ण करा : 2

(*i*) मावशींचे राहण्याचे ठिकाण → [ ]

(*ii*) मावशींना लेकाने दिलेली भेट → [ ]

(*iii*) झोपडीपुढे लावलेले झाड → [ ]

(*iv*) निळ्या तुकड्याच्या मधोमध उमटलेली → [ ]

''मावशी, तुम्ही राहता कुठं ?''

''त्या टेकडीपल्याड'', मावशी म्हणाल्या.

''इथून किती कि.मी. आहे ?''

''तीन.''

''तुम्ही कशा आलात इथपर्यंत ?''

''गेल्या मयन्यापतूर चालतच येत हुते; पन आता माज्या लेकानं एक सायकल दिलीया मला. तवा आता सायकलनं येते'', अशी अजून बरीच माहिती त्यानं भरली. आठवड्यातून सरासरी किती किलोमीटर फिरती होते ? ही फिरस्ती तुम्ही कशी करता ? आतापर्यंत किती झाडं तुम्ही लावली आहेत ?

P.T.O.

https://www.maharashtrastudy.com

रेखामावशी फिरायच्या पायीच, कधीतरी सायकलनं! त्यांच्या इवल्याशा झोपडीपुढंही त्यांनी दोन झाडं लावली होती. त्यांतलं एक लिंबोणीचं होतं; पण एवढी सगळी माहिती सुमित का घेतोय, तेच कुणाला कळेना. रेखामावशी तर फार गडबडून गेल्या. ''आणि आता पाहा, या आहेत रेखामावशींच्या फूटप्रिन्टस.........! असं म्हणत त्यानं मोबाईलचं कसलंसं बटन दाबलं आणि स्क्रीनवर पायपुसणीच्या आकाराचा एक निळा चौकोन उमटला, अगदी आभाळाच्या निरभ्र तुकड्यासारखा! सगळे 'आ' वासून पाहत होते आणि त्या निळ्या तुकड्याच्या मधोमध दोन पावलं उमटली ............. एकदम चंदेरी वर्खात मढलेली आणि खाली इंग्रजीत शब्द उमटले ....... 'सिल्व्हर फूटप्रिन्टस! दि मोस्ट क्लिन फूटप्रिन्टस!!'

''वाऽ पाह्यलंत रेखामावशींचे पाय चंदेरी आहेत.''

(2) **कोण ते लिहा :** 2

(*i*) रेखामावशींची माहिती घेणारा –

(*ii*) चंदेरी पाय असलेल्या –


(3) **स्वमत :**

'ग्लोबल वार्मिंगचे दुष्परिणाम' तुमच्या शब्दात लिहा. 3

**अपठित गद्य**

**(इ) उताऱ्याच्या आधारे सूचनेनुसार कृती करा :**

(1) आकृती पूर्ण करा : 2




https://www.maharashtrastudy.com

दारावर कुणी भिक्षा मागण्यास आला तर आई त्याला भिक्षा घालत असे. एके दिवशी एक धडधाकट भिकारी आला असता रूक्मिणीबाई त्याला भिक्षा घालू लागल्या. विनोबा त्यांना म्हणाले,'' हा तर धडधाकट दिसतो. अशा लोकांना जर भिक्षा देत गेलो तर देशात आळस वाढेल., अपात्राला दान केले तर त्यामुळे दान देणाऱ्याचेही अकल्याण होते,''

रूक्मिणीबाईंनी ते शांतपणे ऐकले आणि म्हणाल्या, ''विन्या, पात्र-अपात्र यांची परीक्षा करणारे आम्ही कोण ? दारावर आलेला प्रत्येक माणूस परमेश्वररूप समजून त्याला शक्तीनुसार देत राहणे एवढे आपले काम आहे. त्याची परीक्षा करणारी मी कोण'' ? विनोबांनी त्यावर टिपणी केलीय की, 'आईच्या या युक्तिवादावर विन्याला दुसरा, युक्तिवाद सुचला नाही.'

(2) जोड्या लावा : 2

| 'अ' गट | 'ब' गट |
|---|---|
| (*i*) दारावर भिक्षा मागायला येणारा | (1) रूक्मिणीबाई |
| (*ii*) भिकाऱ्याला भिक्षा घालणाऱ्या | (2) विनोबा |
| (*iii*) आईच्या युक्तिवादावर टिपणी करणारे | (3) भिक्षेकरी |
| (*iv*) मुलाचे म्हणणे शांतपणे एकून घेणाऱ्या | (4) रूक्मिणीबाई |

P.T.O.

https://www.maharashtrastudy.com

## विभाग 2 : पद्य

2. (अ) कवितेच्या आधारे सूचनेनुसार कृती करा :

(1) चौकटी पूर्ण करा : 2

(i) डोळे भरून पहावी अशी – [ ]

(ii) मुठीमध्ये नसलेले – [ ]

नाही मुठीमधे द्रव्य
नाही शिरेमध्ये रक्त
काय करावें कळेना
नाही कष्टाचे सामर्थ्य;
जीव ओवाळावा तरी
जीव किती हा लहान;
तुझ्या शौर्यगाथेपुढे
त्याची केवढीशी शान;
वर घोंघावे बंबारा,
पुढे कल्लोळ धुराचे,

https://www.maharashtrastudy.com

धडाडत्या तोफांतून
        तुझें पाऊल जिद्दीचें;
तुझी विजयाची दौड
        डोळे भरून पहावी;
डोळ्यांतील आसवांची
        ज्योत ज्योत पाजळावी
अशा असंख्य ज्योतींची
        तुझ्यामागून राखण;
दीनदुबळ्यांचे असें
        तुला एकच औक्षण.

(2) एका वाक्यात उत्तरे लिहा :

(*i*) कष्टाचे सामर्थ्य अपुरे केव्हा वाटते ?

(*ii*) सैनिकाचे पाऊल जिद्दीचे का वाटते ? 2

(3) प्रस्तुत कवितेतील शब्दांचा अर्थ लिहा :

(*i*) द्रव्य –

(*ii*) आसवे –

(*iii*) औक्षण –

(*iv*) कल्लोळ –

(4) 'सैनिक सीमेवर तैनात असतो म्हणून आपण सुरक्षित राहतो', या विधानातील भाव स्पष्ट करा. 2

P.T.O.

https://www.maharashtrastudy.com

(आ) खालील दोन कवितांपैकी कोणत्याही *एका* कवितेसंबंधी दिलेल्या मुद्द्यांच्या आधारे कृती सोडवा :

| मुद्दे | 'दोन दिवस' *किंवा* 'स्वप्न करू साकार' | | |
|---|---|---|---|
| (1) प्रस्तुत कवितेचे कवी/ कवयित्री – | | | 1 |
| (2) प्रस्तुत कवितेचा विषय – | | | 1 |
| (3) प्रस्तुत कवितेतील दिलेल्या दोन ओळींचा सरळ अर्थ लिहा. | 'हे हात माझे सर्वस्व; दारिद्र्याकडे गहाणच राहिले.' | 'या देशाच्या मातीवरती अमुचा रे अधिकार नव्या पिढीचे, नव्या युगाचे स्वप्न करू साकार.' | 2 |
| (4) प्रस्तुत कविता आवडण्याचे वा न आवडण्याचे कारण | | | 2 |
| (5) प्रस्तुत कवितेतील शब्दांचा अर्थ लिहा | (*i*) जिंदगी-<br>(*ii*) बरबाद-<br>(*iii*) हरघडी-<br>(*iv*) दुनिया- | (*i*) ललकारणे-<br>(*ii*) नौबत-<br>(*iii*) विभव-<br>(*iv*) श्रम- | 2 |

https://www.maharashtrastudy.com

## विभाग 3 : स्थूलवाचन

3. **खालीलपैकी कोणत्याही *दोन* कृती सोडवा :** 6

(1) टीप लिहा — डॉ. होमी भाभा.

(2) सूर्य आणि पणती यांच्यातील संवाद स्वतःच्या कल्पनेने लिहा.

(3) टीप लिहा :

सग्वारो कॅक्टस

सग्वारो कॅक्टसचे दिसणे — सग्वारो कॅक्टसचे उपयोग

## विभाग 4 : भाषाभ्यास

4. **(अ) व्याकरण घटकांवर आधारित कृती :**

(1) खालील वाक्यांचा प्रकार ओळखा : 2

(*i*) राष्ट्रगीताचा मान राखा.

(*ii*) हुशारीचे किती ते तेज त्याच्या चेहऱ्यावर!



https://www.maharashtrastudy.com

(2) कंसातील सूचनेनुसार वाक्यरूपांतर करा : 2

(*i*) तो दररोज व्यायाम करतो. (प्रश्नार्थी करा.)

(*ii*) मन अशांत नव्हते. (होकारार्थी करा.)

(3) खालील वाक्प्रचारांचा अर्थ सांगून वाक्यात उपयोग करा (फक्त **दोन**) : 4

(*i*) आर्जव करणे

(*ii*) उत्साहाला उधाण येणे

(*iii*) अंगाचा तिळपापड होणे.

**(आ) भाषिक घटकांवर आधारित कृती :**

(1) **शब्दसंपत्ती :**

(*i*) खालील शब्दांचे समानार्थी शब्द लिहा : 1

शालीन ..............., आनंद ...............

(*ii*) खालील शब्दांचे विरुद्धार्थी शब्द लिहा : 1

खाजगी ..............., चूक ...............

https://www.maharashtrastudy.com

(*iii*) वचन बदला : 1

बांगडी ..............., मित्र ......................

(*iv*) लिंग ओळखा : 1

डोंगर ..............., शिक्षिका ..................

(2) **लेखननियमांनुसार लेखन :**

खालील वाक्ये लेखननियमांनुसार लिहा : 2

(*i*) इथले शीक्षक मनाने खुप श्रीमंत होते.

(*ii*) वाघीणीनं नाला पार करून बांबुच्या गंजीत पाय ठेवला.

https://www.maharashtrastudy.com

(3) **विरामचिन्हे :**

खालील वाक्यांत योग्य विरामचिन्हे वापरून वाक्ये पुन्हा लिहा : 2

(*i*) लाल हिरव्या बांगड्यांकडे त्याने कौतुकाने बघितले

(*ii*) आईने नाराजी व्यक्त केली, पण उपयोग झाला का ?



https://www.maharashtrastudy.com

## विभाग 5 : उपयोजित लेखन

5. (अ) (1) **पत्रलेखन :** 6

खालील निवेदन वाचा व त्याखालील कृती सोडवा.

जनता विद्यालय
अहमदनगर
आयोजित
जिल्हास्तरीय चित्रकला स्पर्धा
दि. 2 जानेवारी वेळ- स. 10.00
संपर्क-मुख्याध्यापक, जनता विद्यालय,
अहमदनगर
E-mail-janatavidya02@gmail.com
मोबा.-0211556680

अभय/आर्या दळवी
विद्यार्थी प्रतिनिधी

या नात्याने

| | | |
|---|---|---|
| स्पर्धेत सहभागी करून घेण्याची विनंती करणारे पत्र मुख्याध्यापकांना लिहा. | **किंवा** | उत्तम आयोजनाबद्दल मुख्याध्यापकांना अभिनंदन करणारे पत्र लिहा. |

https://www.maharashtrastudy.com

किंवा

(2) **सारांशलेखन :**

विभाग 1 गद्य (इ) (प्र. क्र. 1-इ) मधील अपठित गद्य उताऱ्याचा 1/3 एवढा सारांश तुमच्या शब्दांत लिहा.

**(आ) खालीलपैकी कोणत्याही दोन कृती सोडवा :** 10

(1) **जाहिरातलेखन :**

योगासन वर्गाची आकर्षक जाहिरात तयार करा.

(2) **बातमीलेखन :**

तुमच्या शाळेत 5 सप्टेंबर रोजी 'शिक्षक दिन' साजरा झाला. या कार्यक्रमाची बातमी लिहा.

(3) **कथालेखन :**

खालील मुद्द्यांच्या आधारे कथालेखन करा :

**मुद्दे :** अनाथ मुलगा – रोज सकाळी वर्तमानपत्राचे वाटप – दुपारी शाळेत – रस्त्यात एक पाकीट मिळते – वर्गशिक्षकांकडे देणे – पाकिटावरील पत्त्यावरून योग्य व्यक्तीपर्यंत पोहचवणे – मालकाला आनंद – शाबासकी – मुलाला बक्षीस व त्याच्या शिक्षणाची जबाबदारी घेणे.



https://www.maharashtrastudy.com

**(इ)** **लेखनकौशल्य** : खालील लेखनप्रकारांपैकी कोणतीही **एक** कृती सोडवा : 8

(1) **प्रसंगलेखन :**

अश्वमेध सभागृह

– दिव्यांग मुलांनी तयार केलेल्या –

– कलात्मक वस्तूंचे प्रदर्शन –

दि. 15 डिसेंबर वेळ- स. 10 ते रा. 8

प्रमुख पाहुणे – श्रीमती कला परांजपे

35 दिव्यांग व्यक्तींनी तयार केलेल्या


वैशिष्ट्यपूर्ण कलाकृती पाहण्याची संधी.

वरील प्रदर्शन पाहण्यासाठी तुम्ही गेला होतात, अशी कल्पना करून प्रसंगलेखन करा.

https://www.maharashtrastudy.com

(2) **आत्मकथन :**

चौकटीत दिलेल्या घटकाचे आत्मकथन लिहा :




(3) **वैचारिक :**

'मानवी जीवनातील पाण्याचे महत्त्व' या विषयावर तुमचे विचार लिहा.

https://www.maharashtrastudy.com
Whatsapp @ 9300930012
Send your old paper & get 10/-
अपने पुराने पेपर्स भेजे और 10 रुपये पायें,
Paytm or Google Pay से

https://www.maharashtrastudy.com